<u>नियमित फौजदारी खटला क्र.१५२/२०२०</u>
<u>निशाणी क्र.१५</u>

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ ची साक्ष</u>

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | |
|---|---|
| नाव | :– दादाभाई संपतसिंग राजपुत, |
| वय | :– ४९ वर्ष, |
| व्यवसाय | :– ड्रायव्हर, |
| राहणार | :– शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि. धुळे, |

........................................................................................................................

**<u>सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी.पी.चव्हाण यांचे मार्फत.</u>**

दि.११.१२.२०१८ रोजी मला सकाळी ०९.०० वाजता प्रेमसिंग राजपुत याचा फोन आला की, आशाताईला शिरपुर येथील आळे गावी नेले आहे. मी आशाताईला आळे येथे सोडुन आलो त्यावेळी मला पुन्हा फोन आला की, माझा पुतण्या दिपक यास अशोक याने शिवीगाळ केली आणि कैचीच्या लोखंडी आरने मारले. त्यानंतर मी घरी आल्यानंतर विचारपुस केली. त्यानंतर मला अशोक नथुसिंग याने शिवीगाळ केली व डोक्यात दगड मारला. त्यामुळे माझ्या डोक्याला दुखापत झाली. त्यामुळे मी पोलीस स्टेशनला गेलो आणि तेथे मला दवाखान्याचा मेमो देवुन दवाखान्यात पाठवण्यात आले. तेथे माझ्यावर उपचार करण्यात आले. मी आरोपीं विरुध्द फिर्याद दिली. आता मला प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीवर माझी सही आहे. फिर्यादीस **<u>निशाणी क्र.१६ पी/सा.क्र.१</u>** देण्यात येते. ज्या दगडाने मला आरोपीने मारले तो दगड दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला पी.आर.नं.५/२०२५ मध्ये जमा असलेला दगड दाखवण्यात आला. तो तोच दगड आहे. त्यास (आर्टिकल अ) देण्यात येते. मी आरोपीला बघितल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

## उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एम.डी.सोनवणे यांचे मार्फत्.

हे म्हणणे खरे आहे की, आशाताई या स्व. मा. आमदार यांची पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आशाताईंना मुलबाळ नव्हते. आशाताईंचे पती मयत झाल्यानंतर त्यांचा शेतीचा तसेच संस्थेचा व्यवहार आशाताईंकडे होता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आशाताईंच्या स्वर्गीय पती यांच्या वडिलोपार्जित शेत जमीनी होत्या. हे म्हणणे खरे आहे की,आरोपी हे आशाताईंचे सख्खे पुतणे आहेत. दि.११.१२.२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजता मला फोन आल्याबाबत मी फिर्याद देतांना पोलीसांना सांगितले होते. सदरचा मजकुर माझ्या फिर्यादीत नमुद नाही. सदरचा मजकुर माझ्या फिर्यादी का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांची आणि माझी काहीही दुशमनी नाही. मी आशाताईंना ज्या गाडीतुन घेवुन गेलो त्या गाडीचा क्रमांक मी फिर्याद देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रेमसिंग राजपुत याचा मला कोणत्या मोबाईल क्रमांकावरुन फोन आला ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या ठिकाणी मी प्रत्यक्ष हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ अशोक नथेसिंग याचे घर मुस्लीम वस्तीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ च्या घराच्या दोन्ही बाजुला मुस्लीम लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ च्या घराच्या काही अंतरावर कल्या मास्तर यांची पिठाची गिरणी आहे. आरोपी क्र.१ च्या घराच्या पश्चिमेला मुस्लीम वस्ती आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आशाताईंच्या काही शेतजमिनी माझ्याकडे खेडण्यासाठी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आशाताई त्यांच्या शेतजमिनी स्वतः खेडत नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेबाबत माझा पुतण्या दिपक अंकुश याने फिर्याद दिलेली नाही. आरोपी क्र.१ हे विजयसिंग नथेसिंग राजपुत यांचे भाऊ आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे चुलत मामा लागतात. आरोपी धरुन मला किती चुलत मामा आहेत हे मला सांगता

येणार नाही. माझ्या वार्डाचे २०१८ मध्ये नगरसेवक कोण होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये विजयसिंग नथेसिंग राजपुत हे नगरसेवक होते. हे म्हणणे खरे आहे की, ते संस्था चालक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या संस्थेत आरोपी क्र.२ नोकरी करतात. विजयसिंग नथेसिंग राजपुत आणि माझ्यात काही वाद नाही. आमच्यात बोलणे सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी मला बोलवल्यास मी त्यांच्याकडे जातो. हे म्हणणे खरे आहे की, नात्याने ते माझे मामा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते वरिष्ठ असल्यामुळे त्यांनी बोलावल्यास मी त्यांच्याकडे जातो व त्यांनी सांगितलेली कामे ऐकतो. हे म्हणणे खरे आहे की, मला लागेल त्यावेळी ते माझी मदत करतात. हे म्हणणे खरे आहे की, विजयसिंग नथेसिंग राजपुत आणि आरोपींचे आपसात पटत नाही. आशाताईंच्या जमिनीबाबत न्यायालयीन वाद चालु आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आशाताईंच्या काही जमिनी विजयसिंग राजपुत खेडत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमिनींची देखरेख मी करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ मध्ये आशाताईंच्या जमिनी मी कसत होतो आणि मी त्यात कापुस लावत होतो. हे म्हणणे खरे नाही की, कापुस वेचणीसाठी मजुर मिळत नसल्याने मी १२० रुपये रोज ऐवजी २०० रुपये रोजाने मजुर लावत होतो आणि आरोपी मला असे न करण्याबाबत सांगत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला आरोपींचा राग आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझ्यात व आरोपींमध्ये बाचाबाची झाली. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यातला वाद तेथेच मिटला नाही तर मी घरी आल्यानंतर देखील आमच्यात बोलाचाली झाली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी क्र.१ ने माझ्या विरुध्द पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दाखल केली. आरोपी क्र.१ ने माझ्या विरुध्द व माझे इतर भावांविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केली होती किंवा कसे हे मला माहिती नाही. साक्षीदार देविदास भिमसिंग राजपुत हे माझे पाहुणे आहेत व ते शिरपुर येथे राहतात. साक्षीदार राजेंद्र गणपतसिंग राजपुत हे माझे भाऊ आहेत व ते शिंदखेड्यातील जनता नगर येथे

राहतात. प्रेमसिंग लालसिंग राजपुत हे माझे भाऊ आहेत. अंकुश दलपतसिंग राजपुत हे माझे भाऊ आहेत. दिपक अंकुश राजपुत हा माझा पुतण्या आहे व जनता नगर शिंदखेडा येथे राहतो. मी आळे येथुन साधारणतः ११ वाजे पर्यंत आलो होतो. आळे ते शिंदखेडा अंतर साधारणतः ३० कि.मी. आहे. जाण्या येण्यासाठी साधारणतः एका बाजुने ४५ मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ चा मुलगा अपंग असल्याने त्याला चालता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या घराजवळ नेहमी वर्दळ असते. आरोपी क्र.२ रथगल्ली येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, (आर्टिकल अ) प्रमाणे असणरे अनेक दगड ठिकठिकाणी पडलेले असतात. साक्षीदार सांगत आहे की, आरोपीने ज्या दगडाने मारले तोच तो दगड आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दगड मीच पोलीसांना आणुन दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दगडावर रक्ताचे डाग नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ च्या घराला स्लॅपचा ओटा आहे त्याचप्रमाणे पाय–या देखील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या घरातुन उतरत असतांना पायरीवरुन माझा पाय घसरला आणि मी पडल्यामुळे मला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला दगड मारल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मामा विजयसिंग राजपुत आणि आरोपींचे आपसात जमत नसल्याने माझ्या मामाच्या सांगण्यावरुन मी आरोपींवरील वैमनस्यातुन त्यांच्यावर खोटी फिर्याद दाखल केली आहे. मला वैद्यकिय प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कोणताही खर्च आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे मामा नगरसेवक असल्याने त्यांच्या सांगण्यावरुन मला खोटे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळाले आहे. तथाकथित घटनेच्या दिवशी पोलीस स्टेशन मधील पोलीस ठाणे अंमलदार यांना माझ्या मामांनी फोन केला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे स्वतःचे वाहन आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला दगडाने मारल्याबाबत व त्यानंतर मी पोलीस स्टेशनला

गेल्यानंतर मला दवाखान्याचा मेमो मिळाल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आशाताईंना कोणीही वारस नसल्याने त्यांची शेतजमिनी मला हडप करता यावी या उद्देशाने माझ्या मामाच्या सांगण्यावरुन मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आशाताईंच्या मृत्यु पत्रासाठी आरोपींनी हरकत अडथळे करु नये यासाठी मी त्यांच्या विरुध्द माझ्या मामांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीत नमुद केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही दुखापत झालेली नाही. मी अधुन मधुन मद्यपान करतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मद्यपान करत असल्याने त्यामुळे माझा तोल गेला आणि त्यामुळे मला दुखापत झाली.

**फेरतपास पुर्ण.**
**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

(विनिता आ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः– १५/०३/२०२५

−: प्रमाणपत्र :−

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द−न−शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :− | सचिन अरुण परदेशी |
| न्यायालयाचे नाव | :− | सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, शिंदखेडा, जि. धुळे. |

आदेश अपलोड केलेचा दिनांक :− १५/०३/२०२५

सही/−−−
लघुलेखक, श्रेणी−३
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा